# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०११ – १२

## राष्ट्रीय छात्र सेना

प्रभात गुड मॉर्निंग पुणे जिल्हा

प्रभात पुणे ■ रविवार, दि. ९ सप्टेंबर २०१२ | ३

# भविष्याचा सकारात्मक विचार करा- बुट्टे पाटील

■ राजगुरुनगर, दि. ८ (वार्ताहर)- बदलत्या प्रवाहाबरोबर आजच्या तरुणांनी भूतकाळाचा विचार न करता भविष्याचा सकारात्मक विचार करावा, असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले.



राजगुरुनगर येथील राष्ट्रीय छात्र सेनेच्या माजी कॅडेटचा मेळावा झाला त्यावेळी बुट्टे पाटील बोलत होते. यावेळी सांगलीच्या उपजिल्हाधिकारी ज्योती पाटील, ज्येष्ठ पत्रकार कोंडीबा टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य शिरीष पिंगळे, मेजर ए.बी. कानवडेसर, उपप्राचार्य सौ. खेडकर उपस्थित होते. यावेळी बोलतांना बुट्टे पाटील म्हणाले की, आजच्या काळात तरुण मुलांवर प्रेम, श्रम आणि शांतता याविषयी संस्कार करणे गरजेचे आहे. ती जबाबदारी खऱ्या अर्थाने युवकांनी घेण्याची तयारी केली पाहिजे. देशाच्या स्वातंत्र्यासाठी हुतात्मा राजगुरू, भगतसिंग आणि सुखदेव यांनी स्वत: जिवाचे रान करून देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. त्या स्वातंत्र्यवीरांचे स्मरण आजच्या तरुण पिढीने केले पाहिजे. सन १९८८ साली या पथकाची स्थापना झाली. आज या पथकात पन्नासच्या वर कॅडेट आहेत. एनसीसी मधील अनेक छात्र देशात गाजले आहेत. या मेळाव्याला १९८८ ते २०१२ पर्यंतचे छात्र उपस्थित होते.

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख